दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ
बीड महाराष्ट्र | शनिवार , 17 ऑक्टोबर 2026 | अंक क्र. 154 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4
Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

आपल्याकडे काही न्युज सबंधित महत्वाचे व्हीडिओ असतील तर खालील नंबर पाठवा.
मो. 8421577797
आपले नाव गुपीत ठेवण्यात येईल

## नवी मुंबईकरांवर पुन्हा पाणीकपातीची टांगती तलावर ; १६ ऑक्टोबरपासून १० टक्के पाणीकपातीचे निर्देश



**■ नवी मुंबई : वृत्तसंस्था**

राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देत १६ ऑक्टोबरपासून किमान १० टक्के पाणीकपात करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. या पार्श्वभूमी- वर नवी मुंबई महापालिकेने वर्षभर पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी सूक्ष्म नियोजन सुरू केले आहे. त्यामुळे शहरात पुन्हा पाणीकपात लागू होण्याची शक्यता असून, याबाबतचा निर्णय लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे.

**पाण्याची उपलब्धता आणि पुरवठ्याचा आढावा :** महापालिकेच्या मोरबे धरणात सध्या सुमारे ९२ टक्के पाणीसाठा आहे. यंदा धरण पूर्ण क्षमतेने भरले नसल्याने पुढील वर्षभराच्या पाणीपुरवठ्याचे नियोजन करताना महापालिकेला खबरदारी घ्यावी लागत आहे. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पाण्याची उपलब्धता आणि विविध घटकांना होणाऱ्या पुरवठ्याचा आढावा घेतला जात आहे.

**पाणीपुरवठ्याचाही नव्याने आढावा :** पाणीगळती रोख- ण्यासाठी विशेष मोहीम राबवण्याचे नियोजन असून, अनावश्यक पाणीवापरा- वरही नियंत्रण आणले जाणार आहे. त्याचबरोबर सांडपाणी प्रक्रिया केंद्रे पूर्ण क्षमतेने चालवून प्रक्रिया केलेले पाणी बागा, बांधकामे, वाहन धुलाई यांसारख्या कामांसाठी वापरण्यावर भर दिला जाणार आहे. बांधकाम प्रकल्प, वाहन धुलाई केंद्रे आणि तरणतलावांना होणाऱ्या पाणीपुरवठ्याचाही नव्याने आढावा घेतला जात आहे.

**नागरिकांची गैरसोय :** शहरात सध्या नियमित पाणीपुरवठा सुरू असला तरी काही भागांत गेल्या महिनाभरापासून कमी दाबाने किंवा अल्प वेळ पाणी मिळत असल्याच्या तक्रारी आहेत. घणसोलीमधील सिम्पलेक्स वसाह- तीत दिवसातून केवळ अर्धा तास पाणी येत असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. उंच इमारतींमध्ये वरच्या मजल्यांवर पाणी पोहोचत असले, तरी खालच्या मजल्यांवर पुरेसा दाब नसल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत.

**पाणीपुरवठ्याबाबत महापालिकेची भूमिका :** दरम्यान, शहरात मोठ्या प्रमाणावर पुनर्विकास आणि बांधकाम प्रकल्प सुरू आहेत. या प्रकल्पांसाठी काही ठिकाणी पिण्याच्या पाण्याचा वापर होत असल्याची माहिती महापालिकेला मिळाली आहे. त्यामुळे बांधकामांसाठी प्रक्रिया केलेले पाणी वापरणे सक्तीचे करण्याचा पर्यायही विचाराधीन आहे. पुढील काळात पाण्याची उपलब्धता आणि मागणी यांचा ताळमेळ राखण्यासाठी नागरिकांनाही पाण्याचा काटकसरीने वापर करावा लागणार आहे. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे लवकरच पाणीपुरवठ्याबाबत महापालिकेची भूमिका आणिनियोजन स्पष्ट करण्याची शक्यता आहे.

**मोरबे धरणात ९२ टक्के पाणीपुरवठा :** याआधी देखील नवी मुंबई मध्ये सोळा तास पाणीपुरवठा बंद ठेवण्यात आला होता.पाऊस कमी आणि एल-निनोबाबत वर्तविण्यात आलेले अंदाज या सगळ्याचा परिणाम नवी मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या मोरबे धरणावर झाला. सध्या या धरणात ९२ टक्के पाणीसाठा असला तरी येणारी उष्णता आणि चालू असलेला ऑक्टोबर हिट ,पाणीटंचाई यांचा परिणाम नागरिकांवर होणार आहे.यामुळे पाण्याचे नियोजन करणे आणि गरज ओळखून पाण्याचा वापर करणे नागरिकांच्या हिताचे असेल

## भगवान भक्तिगडावरील दसरा मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहा!

### राजेश गित्ते यांचे भगवान भक्तांच्या आणि मुंडे समर्थकांना आवाहन



**■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या जन्मभूमीतील सावरगाव घाट येथील भगवान भक्तिगडावर आयोजित करण्यात येणाऱ्या ऐतिहासिक दसरा मेळाव्याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या मेळाव्यास भगवान बाबांचे भक्त, मुंडे समर्थक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन परळी वैजनाथ भाजपा तालुकाध्यक्ष राजेश गित्ते यांनी केले आहे.

#### वंचित, शोषितांच्या एकजुटीचे प्रतीक असलेला मेळावा

सावरगाव घाट येथील भगवान भक्तिगडावर होणारा दसरा मेळावा हा केवळ धार्मिक सोहळा नसून वंचित आणि शोषित समाजाच्या एकजुटीचे प्रतीक म्हणून ओळखला जातो. राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या विचारांना अभिवादन करण्यासाठी आणि पंकजाताई मुंडे यांचे मार्गदर्शन ऐकण्यासाठी दरवर्षी राज्याच्या विविध भागांतून लाखो भाविक व समर्थक या ठिकाणी दाखल होतात. यंदाही २० ऑक्टोबर रोजी होणाऱ्या दसरा मेळाव्यासाठी भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, या मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन राजेश गित्ते यांनी केले आहे.



**सावरगाव घाट येथील भगवान भक्तिगडावर २० ऑक्टोबर रोजी दसरा मेळावा ; ना . पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाकडे राज्याचे लक्ष**

#### भगवान भक्तिगडाचे ऐतिहासिक महत्त्व

राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या जन्मभूमीतील भगवान भक्तिगडाला विशेष धार्मिक आणि सामाजिक महत्त्व आहे. पाण्यावर ज्ञानेश्वरी वाचन करत असल्याच्या स्वरूपातील भगवान बाबांची भव्य मूर्ती तसेच तळघरातील मूर्ती हे या स्थळाचे विशेष आकर्षण आहे. भगवान बाबांच्या विचारांचा जागर आणि समाजातील एकतेचा संदेश देणारा हा दसरा मेळावा दरवर्षी लाखो भक्तांच्या उपस्थितीत पार पडतो. या ऐतिहासिक दसरा मेळाव्याला उपस्थित राहून भगवान बाबांच्या विचारांना अभिवादन करावे आणि पंकजाताई मुंडे यांचे मार्गदर्शन ऐकावे, असे आवाहन भाजपा तालुकाध्यक्ष राजेश गित्ते यांनी केले आहे.

## चमत्कार दाखवण्याचे आमिष दाखवून लुटणाऱ्या भामट्यांचा पर्दाफाश

### स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

**■ बीड / माजलगाव : प्रतिनिधी**

बसस्थानक परिसरात निष्पाप प्रवाशांना आणि विशेषतः वयोवृद्ध नागरिकांना "चमत्कार दाखवतो" असे सांगून भुलवणाऱ्या आणि हातचालाखीने सोन्याचे दागिने लांबवणाऱ्या अट्टल भामट्यांच्या स्थानिक गुन्हे शाखेने मुसक्या आवळल्या आहेत. या कारवाईत नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर येथील तीन सराईत गुन्हेगारांना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून १ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक २९ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजेच्या सुमारास जगन्नाथ दगडुबा भागवत हे वयोवृद्ध नागरिक माजलगाव बसस्थानकावर वडवणी येथे जाण्यासाठी बसची वाट पाहत थांबले होते. यावेळी अनोळखी तीन चोरट्यांनी त्यांना गाठले. "दगडापासून रुद्राक्ष बनवतो" असा खोटा चमत्कार दाखवून आणि त्यांना विश्वासात घेऊन हातचालाखीने त्यांच्या हातातील सोन्याची अंगठी चोरून नेली. याप्रकरणी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा (रजिस्टर क्र. ३३२/२०२६, कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता) दाखल करण्यात आला होता.

#### तालखेड फाट्यावर सापळा अन् कारवाई

दिनांक १६ ऑक्टोबर २०२६ रोजी पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पथक माजलगाव हद्दीत संशयितांचा शोध घेत असताना तालखेड फाट्याजवळ दोन मोटारसायकलवरून तिघे तोंडाला रुमाल बांधून संशयितरीत्या जाताना दिसले. पोलिसांनी त्यांना थांबवून विचारपूस केली असता, त्यातील एक जण दुचाकीवरून माजलगावच्या दिशेने पळून गेला. उर्वरित दोघांकडे आणि पळून गेलेल्या साथीदाराबद्दल कसून चौकशी केली असता त्यांनी सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र, पोलिसांनी त्यांना विश्वासात घेऊन अधिक विचारपूस केली असता त्यांनी नाशिक व इतर ठिकाणच्या बसस्थानकांवर वयोवृद्ध नागरिकांना चमत्काराचे आमिष दाखवून सोन्याचे दागिने ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने, पोह/महेश जोगदंड, पोह/ जफर पठाण, पोह/बप्पासाहेब घोडके, पोह/दिलीप गिते आणि चापोह/गणेश मराडे यांच्या पथकाने केली आहे.

#### अटक करण्यात आलेले आरोपी

- आसिफ अजित मदारी (वय २२ वर्ष, रा. विकासवाडी, मालेगाव, जि. नाशिक) अफजल सलीम मदारी (वय २८ वर्ष, रा. ग्रामपंचायतीच्या पाठीमागे, शिंदे नगर, नाशिक)
- हुसेन हसन मदारी (वय २७ वर्ष, रा. म्हाडा कॉलनीच्या मागे, सातारा परिसर, छत्रपती संभाजीनगर) १,८०,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त आरोपींच्या ताब्यातून पोलिसांनी ५ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी आणि दोन मोटारसायकल असा एकूण १,८०,००० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.



# वेस्ट इंडिजचा भारतावर 24 धावांनी विजय, मालिका 2-2 ने बरोबरीत; एकटा बॉलर भारताला पडला भारी

■ मुंबई : प्रतिनिधी

वेस्ट इंडिज संघाने चौथ्या टी-२० सामन्यात भारतावर २४ धावांनी मात केली. या सामन्यात वेस्ट इंडिज संघाने टॉस हारल्यानंतर २० ओव्हरमध्ये २४७-४ धावांचा अवाढव्य डोंगर उभा केला होता. या आव्हानाचा पाठलाग करताना भारताने २२३-९ धावा केल्या. वेगवान गोलंदाज कीमो पॉल याने पाच विकेट घेत भारताला बॅकफूटवर ढकलेले. संजू सॅमसन याने ५६ धावांची आक्रमक अर्धशतकी खेळी केली. लोकल बॉय नीतीश कुमार रेड्डी (४१ धावा) आणि तिलक वर्मा (४३ धावा) यांनी आक्रमक खेळी करत विजयाच्या आशा जिवंत ठेवल्या होत्या. पण एकही मोठी भागीदारी झाली नाही. दबावात आल्यामुळे मोठे फटके मारण्याच्या प्रयत्नात विकेट गमावल्या. या विजयासह वेस्ट इंडिज संघाने २-२ने मालिकेत बरोबरी केली आहे.



### वेस्ट इंडिजची बॅटिंग

भारतीय गोलंदाजांचा धुव्वा उडवत कॅरेबियन फलंदाजांनी हैदराबादच्या मैदानावर चौफेर फटकेबाजीचे प्रदर्शन केले. वेस्ट इंडिजचा कर्णधार शाई होप याने गाजवला. त्याने अवघ्या ५० चेंडूंमध्ये ९ षटकार आणि ४ चौकारांच्या मदतीने १०२ धावांची नाबाद शतकी खेळी साकारली. हे त्याचे या मालिकेतील दुसरे आणि टी-२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील तिसरे शतक ठरले. सलामीवीर जुएल अँड्र्यू याने १६ चेंडूत २१ धावा करून डावाची सुरुवात करून दिली. त्यानंतर मैदानात आलेल्या शिमरॉन हेटमायर याने १२ चेंडूत ३३ धावांची विस्फोटक खेळी करत २७५ च्या स्ट्राईक रेटने धावा कुटल्या. कर्णधार रोव्हमन पॉवेल यानेही १७ चेंडूत २४ धावांचे योगदान दिले. डावाच्या अंतिम टप्प्यात शेरफेन रदरफोर्ड याने शे होपला भक्कम साथ दिली. रदरफोर्डने अवघ्या २६ चेंडूत ४ चौकार आणि ३ षटकारांसह नाबाद ४९ धावा कुटल्या. त्यांच्या या तुफानी फलंदाजीमुळे वेस्ट इंडिजने भारतासमोर २४८ धावांचे विशाल लक्ष्य ठेवले होते. भारताकडून अर्शदीप सिंह, मयंक यादव आणि प्रिन्स यादव यांनी प्रत्येकी १-१ विकेट मिळवली. याला बोलतात सोच! सुसाट सुटलेल्या हेटमायरला रोखण्यासाठी श्रेयस अय्यरने चक्रव्यूहामध्ये अडकवलंच; एक निर्णय ठरला गेमचेंजर या धावांचा पाठलाग करताना भारताकडून संजू सॅमसन याने सुरूवातीपासूनच आक्रमक पवित्रा घेतला होता. संजू सॅमसनने अवघ्या २३ चेंडूत ५६ धावांची तुफानी खेळी करत भारताला शानदार सुरुवात करून दिली. त्याने ६ चौकार आणि ४ षटकार मारत धावगती राखली होती. मात्र अभिषेकची बॅट शांत राहिली त्याने जास्तच सावध पवित्रा घेतल्याचं पाहायला मिळालं. ईशान किशन ६ धावा, श्रेयस अय्यर १६ धावा आणि नमन धीर ० धावा करून स्वस्तात परतले. मधल्या फळीत तिलक वर्माने २५ चेंडू ४३ धावा आणि नीतीश कुमार रेड्डीने २० चेंडूत ४१ धावा करत सामना शेवटपर्यंत नेण्याचा प्रयत्न केला. पण विजय मिळवून देऊ शकले नाहीत. आता पाचव्या सामन्यात कोण विजय मिळवत मालिका खिशात घालणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

### सामन्याचा टर्निंग पॉइंट

■ संजू सॅमनस याने टी-२०मध्ये १०० षटकार पूर्ण केले. आज त्याने अवघ्या २० चेंडूत ५१ धावा, ६ चौकार आणि ४ षटकार मारले होते. संजूने सामना एकहाती ओढायला सुरूवात केलेली पण कीमो पॉलने पहिला धक्का दिला होता. त्यानंतर ईशान किशनलाही त्याच ओव्हरमध्ये आऊट दोन धक्के दिले आणि तिथेच सर्व सामना फिरला. भारताचे अंतिम ११ खेळाडू : संजू सॅमसन (WK), अभिषेक शर्मा, इशान किशन, श्रेयस अय्यर (C), तिलक वर्मा, नमन धीर, नीतीश कुमार रेड्डी, अक्षर पटेल, अर्शदीप सिंग, प्रिन्स यादव, मयंक यादव वेस्ट इंडिज अंतिम ११ खेळाडू : शाई होप (C&WK), ज्वेल अँड्र्यू, शिमरॉन हेटमायर, रोव्हमन पॉवेल, शेरफेन रदरफोर्ड, रोमारियो शेफर्ड, रोस्टन चेस, कीमो पॉल, शामार स्प्रिंगर, गुडाकेश मोती, शामार जोसेफ

## न्यूझीलंडविरुद्ध वनडे आणि कसोटी मालिकेसाठी भारतीय संघ निवडीला 3 खेळाडूंमुळे उशीर

■ मुंबई : प्रतिनिधी

भारतीय संघ येत्या २२ ऑक्टोबरपासून न्यूझीलंड दौऱ्याला सुरूवात करणार आहे. या दौऱ्यामध्ये आधी टी-२०, ४ नोव्हेंबरपासून वनडे आणि १९ नोव्हेंबरपासून कसोटी मालिकेला सुरूवात होणार आहे. वनडे आणि कसोटी संघाची घोषणा अद्याप झालेली नाहीये. या आठवड्यामध्ये निवड समितीची बैठक होऊन संघ जाहीर होईल अशी शक्यता होती. पण, आता संघ निवडीला आणखी उशीर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. कारण तीन खेळाडूंच्या फिटनेसचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे संघ निवडीला विलंब झाल्याचं म्हटलं जात आहे. तर हे 3 खेळाडू नेमके कोण आहेत हे आपण जाणून घेऊया.

न्यूझीलंड दौऱ्यासाठी भारतीय संघाची निवड करण्यापूर्वी ऋषभ पंत, प्रसिद्ध कृष्णा आणि हर्षित राणा यांच्या फिटनेसबाबतची माहिती निवड समितीला हवी आहे. निवड समिती या तिन्ही खेळाडूंच्या फिटनेस रिपोर्टची वाट पाहत आहेत. कारण हर्षित राणा हा वनडे संघासाठी महत्त्वाचा खेळाडू मानला जातो. तर प्रसिद्ध कृष्णा हा कसोटी आणि वनडे या दोन्ही फॉरमॅटमध्ये भारतीय संघाचा भाग राहिला आहे. सोबतच ऋषभ पंतची देखील कसोटी संघामध्ये निवड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे हे तिन्ही खेळाडू आगामी दौऱ्यासाठी उपलब्ध असणार का हे स्पष्ट झाल्यानंतर संघ निवडीचा निर्णय होऊ शकतो.



प्रसिद्ध कृष्णा हा दुखापतीतून सावरण्यासाठी बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये पुनर्वसन प्रक्रिया पूर्ण करत असून त्याला पूर्णपणे तंदुरूस्त होण्यासाठी ३ आठवड्यांचा कालावधी देण्यात आला होता. तसेच हर्षित राणा जुलै महिन्यापासून सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये असून तो २५ ऑक्टोबरला सराव सामना खेळणार असल्याचं म्हटलं जात आहे. तर या सामन्यातील त्याची कामगिरी आणि फिटनेस पाहून त्याच्या उपलब्धतेबाबत अधिक स्पष्टता मिळण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, काही दिवसांपूर्वीच बीसीसीआयने ऋषभ पंतच्या दुखापतीबाबत माहिती दिली होती. त्यामुळे पंत देखील दुखापतीचा सामना करत असून तो न्यूझीलंड दौऱ्यातील भारत अ संघाच्या सुरूवातीचे दोन सामने खेळू शकणार नसल्याचं म्हटलं जात होतं. त्यामुळे आता पंत कसोटी मालिकेसाठी पूर्णपणे फिट होतो का याकडे निवडकर्त्यांचं लक्ष लागले आहे. तर या तिन्ही खेळाडूंच्या फिटनेसबाबत माहिती मिळाल्यानंतरच निवड समितीची बैठक होणार असून त्यात वनडे आणि कसोट संघ जाहीर केले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## आशियाई क्रीडा स्पर्धेतील हिरोंशी थेट संवाद साधणार पंतप्रधान नरेंद्र मोदी?

■ नवी दिल्ली वृत्तसंस्था

जपानमधील आयची-नागोया येथे पार पडलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धा 2026 मध्ये भारताच्या खेळाडूंनी इतिहास रचला आहे. भारताने या महाउत्सवात तुफानी कामगिरी करत पदकतालिकेत चौथे स्थान पटकावले आहे. या ऐतिहासिक यशानंतर आता देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी गुरुवारी, 15 ऑक्टोबर रोजी नवी दिल्लीतील मेजर ध्यानचंद राष्ट्रीय स्टेडियममध्ये थेट खेळाडूंशी संवाद साधणार आहेत. सायंकाळी सुमारे 4:30 वाजता हा विशेष कार्यक्रम पार पडणार असून, यामध्ये पंतप्रधान खेळाडूंशी बातचीत करून उपस्थितांना संबोधित करणार आहेत. या भव्य सोहळ्यात भारतीय पथकातील शिलेदार, त्यांचे मार्गदर्शक (प्रशिक्षक), सहाय्यक कर्मचारी, भारतीय ऑलिम्पिक संघटनेचे पदाधिकारी, राष्ट्रीय क्रीडा महासंघांचे प्रतिनिधी तसेच युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालयाचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.



### भारताची ऐतिहासिक आणि रेकॉर्डब्रेक कामगिरी

यंदाच्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी अफाट पराक्रम गाजवत एकूण 85 पदकांची कमाई केली. यामध्ये 21 सुवर्ण, 27 रौप्य आणि 37 कांस्य पदकांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, भारताने सलग दुसऱ्यांदा या स्पर्धेच्या पहिल्या पाच देशांमध्ये आपले स्थान पक्के केले असून, भारतीय खेळाडूंची जागतिक स्तरावरील वाढती स्पर्धात्मक क्षमता यावरून स्पष्ट होते. या स्पर्धेतील काही कामगिरी तर खरोखरच अंगावर शहारे आणणाऱ्या आहेत. तिरंदाजीच्या रिकर्व्ह प्रकारात भारताने अभूतपूर्व यश मिळवले. तसेच, ऐतिहासिक पाऊल उचलत भारतीय पुरुष आणि महिला दोन्ही हॉकी संघांनी एकाच स्पर्धेत सुवर्णपदक पटकावून तिरंगा फडकवला. याशिवाय, सॉफ्ट टेनिस आणि मिक्स्ड मार्शल आर्ट्स (एमएमए) यांसारख्या कठीण क्रीडा प्रकारांत भारताने प्रथमच पदकांची कमाई करत नवीन पाऊलवाट तयार केली.

महिला ट्रॅप प्रकारात भारताने प्रथमच सुवर्णपदकाचा मान मिळवला. दुसरीकडे, भारोत्तोलनात तब्बल 28 वर्षांच्या मोठ्या खंडानंतर भारताला आशियाई क्रीडा स्पर्धेत रौप्यपदक मिळाले. ग्रीको-रोमन कुस्तीमध्येही भारतीय मल्लाने रौप्यपदक जिंकत तब्बल 64 वर्षांनंतर या प्रकारात अंतिम फेरीत धडक मारण्याची ऐतिहासिक कामगिरी केली. भारतीय पथकाच्या या अभूतपूर्व आणि प्रेरणादायी यशाचा गौरव करण्यासाठीच पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः खेळाडूंशी संवाद साधणार आहेत. या संवादातून खेळाडूंना आणखी प्रोत्साहन मिळेल आणि भविष्यातील स्पर्धांसाठी ते अधिक जोमाने सज्ज होतील, यात शंका नाही.

## पार्थिव पटेलचा अर्जच नाही! अजित आगरकरांनंतर टीम इंडियाचा नवा चीफ सिलेक्टर कोण?

■ मुंबई : प्रतिनिधी

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या वरिष्ठ पुरुष निवड समितीमध्ये पश्चिम विभागाचे प्रतिनिधी म्हणून अजित आगरकर यांच्या जागी नियुक्त होण्यासाठी भारताचे माजी यष्टिरक्षक पार्थिव पटेल प्रबळ दावेदार मानले जात होते. मात्र, त्यांनी या पदासाठी अर्ज केलेला नाही. त्यामुळे प्रज्ञान ओझा यांच्यासाठी उर्वरित कार्यकाळापर्यंत अध्यक्षपदी कायम राहण्याचा मार्ग मोकळा झाल्याचे मानले जात आहे.

पश्चिम विभागाचे रिक्त पद भरण्यासाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख बुधवारी संपली. मात्र, पार्थिव यांनी निवड प्रक्रियेपासून दूर राहण्याचा निर्णय घेतला. 'बीसीसीआय अर्ज करण्याची मुदत वाढवेल की नाही, हे मला माहिती नाही. मात्र, १४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत पार्थिव यांनी अर्ज केलेला नव्हता. मुदत वाढवली गेली किंवा त्यांनी आपला निर्णय बदलला, तर परिस्थिती बदलू शकते,' असे बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले.



### ओझा अध्यक्षपदी कायम राहण्याची शक्यता

दक्षिण विभागाचे प्रतिनिधित्व करणारे ओझा कार्यकाळाच्या आपल्या उर्वरित कालावधीपर्यंत अध्यक्षपदी कायम राहण्याची शक्यता आहे. विद्यमान निवड समितीतील सदस्यांमध्ये ओझा यांच्या नावावर सर्वाधिक कसोटी क सामने असल्याने त्यांची दावेदारी मजबूत मानली जात आहे. वरिष्ठ निवड समितीत भूमिका स्वीकारण्याऐवजी पार्थिव 'गुजरात टायटन्स'च्या सहायक पथकातील जबाबदाऱ्या आणि समालोचनाशी संबंधित कामे सुरू ठेवू शकतात, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

ज्युनिअर पुरुष निवड समितीचे अध्यक्ष होण्यासाठी प्रबळ दावेदार मानले जाणारे रमेश पोवार आता पश्चिम विभागातून वरिष्ठ निवडकर्त्याच्या पदासाठी दावेदारी करू शकतात. भारताचे माजी यष्टिरक्षक समीर दिघे यांचे नावही चर्चेत आहे. निवड समितीतील पदांसाठी मागील वेळी अर्ज मागवण्यात आले होते, तेव्हा पोवार आणि दिघे या दोघांनीही अर्ज केला होता. मात्र, पश्चिम विभागातून या पदासाठी प्रमुख उमेदवारांची संख्या मर्यादित असल्याचे दिसते. बीसीसीआयने अर्ज करण्याची मुदत वाढवून पार्थिव यांना संधी दिल्यासच ही परिस्थिती बदलू शकते.

### माजी निवडकर्ते अजित आगरकर यांची कारकीर्द

अजित आगरकर यांचा मुख्य निवडकर्ता म्हणून कार्यकाळ अत्यंत धाडसी आणि कठोर निर्णयांसाठी ओळखला जातो. त्यांच्या नेतृत्वाखालील समितीने भारतीय क्रिकेटच्या हितासाठी अनेक मोठे निर्णय घेतले. ज्यामध्ये हार्दिक पांड्याऐवजी सूर्यकुमार यादवची टी-२० चा कर्णधार म्हणून निवड करणे, शिस्त आणि देशांतर्गत क्रिकेटला महत्त्व न दिल्याने ईशान किशन आणि श्रेयस अय्यर यांचे केंद्रीय करार रद्द करणे, आणि चेतेश्वर पुजारा, अजिंक्य रहाणे यांसारख्या दिग्गज खेळाडूंच्या पलीकडे जाऊन युवा खेळाडूंना संधी देणे समाविष्ट होते.

## सिंधू अन् लक्ष्य सेन पहिल्याच फेरीत गारद; डेन्मार्क ओपनमध्ये भारताला मोठा झटका

■ ओडेन्से (डेन्मार्क)

डेन्मार्क ओपन बॅडमिंटन स्पर्धेतून भारतासाठी एक अत्यंत निराशेची बातमी समोर आली आहे. भारताचे दिग्गज शटलर पी.व्ही. सिंधू आणि लक्ष्य सेन यांना पहिल्याच फेरीत दारूण पराभवाचा सामना करावा लागला आहे. स्टार खेळाडूंच्या या खराब कामगिरीमुळे भारतीय चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. मात्र, याच स्पर्धेत अनुभवी खेळाडू किदाम्बी श्रीकांत आणि युवा स्टार तन्वी शर्मा यांनी चमकदार कामगिरी करत दुसऱ्या फेरीत दिमाखात प्रवेश केला आहे.




### सिंधू अन् लक्ष्यचे पॅकअप

दोनवेळा ऑलिम्पिक पदक जिंकणाऱ्या पी.व्ही. सिंधूची या स्पर्धेतील सुरुवात अतिशय खराब ठरली. तिला जर्मनीच्या इव्होन लीकडून 13-21, 25-23, 19-20 अशा फरकाने पराभव पत्करावा लागला. विशेष म्हणजे, ली विरुद्धच्या मागील चार सामन्यांत सिंधूने नेहमी विजय मिळवला होता, मात्र या ऐतिहासिक लढतीत तिला पराभवाची नामुष्की पत्करावी लागली. निर्णायक गेममध्ये 19-15 अशी मजबूत आघाडी असतानाही सिंधू विजयापासून मुकली.

दुसरीकडे, पुरुष एकेरीत भारताचा आघाडीचा शटलर लक्ष्य सेन याचेही आव्हान पहिल्याच फेरीत संपुष्टात आले. त्याला चायनीज तैपेईच्या जागतिक क्रमवारीत तिसऱ्या स्थानी असलेल्या चोऊ टिएन-चेनविरुद्ध 18-21, 21-13, 15-21 असा पराभव स्वीकारावा लागला. विशेष म्हणजे, बीडब्ल्यूएफ (BWF) वर्ल्ड टूरवरील त्याच्या गेल्या सहा स्पर्धांपैकी पहिल्याच फेरीत बाहेर पडण्याची लक्ष्यची ही पाचवी वेळ ठरली आहे.

### श्रीकांत आणि तन्वीकडून दिलासादायक कामगिरी

मोठ्या खेळाडूंच्या पराभवानंतर भारताच्या किदाम्बी श्रीकांतने मात्र मान उंचावण्यास भाग पाडले. 2017 च्या डेन्मार्क ओपनचा विजेता राहिलेल्या श्रीकांतने फ्रान्सच्या अर्नॉड मर्क्लेचा 22-20, 21-19 असा सरळ गेममध्ये पराभव करत पुढील फेरीत धडक मारली. याशिवाय, युवा खेळाडू तन्वी शर्माने जपानच्या नात्सुकी निदाइराचा 21-17, 16-21, 21-19 असा संघर्षपूर्ण पराभव करून आगेकूच कायम ठेवली आहे. आता पुढील फेरीत तन्वी आणि इव्होन ली यांच्यात सामना रंगणार आहे.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# SFI संघटनेच्या आंदोलनाला अखेर यश!

## मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या लेखी आश्वासनानंतर बेमुदत उपोषण मागे

**जव्हार (वा.) | प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमधील विविध समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (SFI) संघटनेच्या वतीने १२ ऑक्टोबरपासून सुरू करण्यात आलेल्या बेमुदत उपोषणाला अखेर यश आले आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी आंदोलनकर्त्यांना लेखी आश्वासन दिल्यानंतर SFI संघटनेने आपले बेमुदत उपोषण मागे घेतले.

पालघर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्या सोडविण्यात याव्यात, तसेच शाळांमधील शैक्षणिक सुविधांबाबत प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, या प्रमुख मागण्यांसाठी SFI संघटनेने या आंदोलनाचे हत्यार उपसले होते. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी संबंधित प्रश्न तातडीने मार्गी लावावेत आणि शाळांमधील समस्यांचे निराकरण करावे, अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली होती.

■ **विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी संघटनेचा लढा**

जिल्हा परिषद शाळांमधील समस्यांमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर परिणाम होऊ नये, यासाठी प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी भूमिका SFI संघटनेने घेतली. या मागण्यांसाठी १२ ऑक्टोबरपासून बेमुदत उपोषण सुरू करण्यात आले होते. आंदोलनाच्या माध्यमातून संघटनेने प्रशासनाचे लक्ष विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे वेधले.

अखेर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी आंदोलनकर्त्यांना मागण्यांसंदर्भात लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांवर सकारात्मक निर्णय होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.






■ **लेखी आश्वासनाची अंमलबजावणी होणार का?**

प्रशासनाने दिलेल्या लेखी आश्वासनामुळे आंदोलनाला यश मिळाले असले, तरी जिल्हा परिषद शाळांमधील प्रत्यक्ष समस्या कितपत आणि किती लवकर सोडवल्या जातात, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण आणि आवश्यक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने आश्वासनांची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न ऐरणीवर आणणाऱ्या या आंदोलनामुळे जिल्हा परिषद शाळांमधील समस्यांच्या निराकरणासाठी प्रशासन किती तत्परतेने कार्यवाही करते, हे आगामी काळात स्पष्ट होणार आहे.

# प्रलंबित शेतरस्त्यामुळे 70 वर्षीय विधवा शेतकरी संकटात ; सोयाबीनची गंजी शेतातच पडून, हिवरा संगम येथील प्रकार

**महागाव | प्रतिनिधी**

तालुक्यातील हिवरा संगम येथील 70 वर्षीय विधवा महिला शेतकरी लक्ष्मीबाई अवधुत अडकिने यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. गट नंबर 59/3-ब मध्ये असलेले त्यांचे सोयाबीन व तूर हे आंतरपीक काढणीस आले असूनही केवळ शेतरस्ता नसल्यामुळे संपूर्ण पीक शेतातच पडून आहे.

प्राप्त माहितीनुसार, पांदण रस्त्याच्या पुढे नाला आणि कालवा असल्याने ट्रॅक्टर, ट्रॉली व मळणी यंत्र शेतापर्यंत पोहोचू शकत नाही. त्यामुळे काढलेले सोयाबीन शेतातच गंजी करून ठेवावे लागले आहे. पावसाची शक्यता असल्याने पीक सडून मोठे आर्थिक नुकसान होण्याची भीती आहे. "माझ्या कुटुंबाचे उपजीविकेचे साधन केवळ शेतीच आहे, रस्ता नसल्यामुळे मला शेतीची कामे आणि वाहतूक करणे अशक्य झाले आहे," असे लक्ष्मीबाई अडकिने यांनी सांगितले.

याबाबत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चे कलम 143 अंतर्गत तहसीलदार, महागाव यांच्याकडे रस्त्याचे प्रकरण प्रलंबित आहे. मंडळ अधिकारी, हिवरा यांनी दिनांक 16/07/2026 रोजी स्थळ पाहणी करून अहवाल व नकाशा तहसील कार्यालयास सादर केला असून, त्या अहवालातही विद्यमान पांदण रस्ता गट नं. 59/3-ब पर्यंत प्रत्यक्ष पोहोचत नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

अनेक वेळा प्रशासनाकडे विनंती करूनही रस्त्याचा प्रश्न जैसे थेच आहे. त्यामुळे या कुटुंबावर आत्महत्या करण्याची वेळ आल्याचे विधवा महिलेने म्हटले आहे.

या प्रकरणी कर्तव्यनिष्ठ तहसीलदार मानवतेच्या दृष्टीकोनातून तात्काळ अंतरिम आदेश देऊन, अंतिम निकाल लागेपर्यंत तात्पुरता वहीवाट रस्ता मोकळा करून द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांतून होत आहे.




# वटणवाडी गावातील पाणीप्रश्न सोडविण्याची किरण शिनगिरे यांची मागणी

**देऊळगाव (आदिनाथ ठोंबरे)**

आष्टी तालुक्यातील वटणवाडीगावातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न तातडीने सोडवून ग्रामस्थांना नियमित पाणी उपलब्ध करून द्यावे, तसेच गावासाठी तात्काळ पाणी टँकर मंजूर करावा, अशी मागणी किरण शिनगिरे, दीपक शिरोळे, बाळासाहेब पोकळे यांच्यासह ग्रामस्थांनी केली आहे. यासंदर्भात गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर रोजी आष्टी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रयाग ढमाळ यांच्याकडे निवेदन सादर करण्यात आले.

वटणवाडी गावात पाणीपुरवठ्याबाबत निर्माण झालेल्या अडचणींमुळे ग्रामस्थांना पाण्यासाठी त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन संबंधित विभागामार्फत गावाची प्रत्यक्ष पाहणी करावी आणि पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने कराव्यात, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.



वटणवाडी गावात मोठ्या प्रमाणावर दुग्धव्यवसाय सुरू असून, गावातील अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह या व्यवसायावर अवलंबून आहे. मात्र, पाण्याच्या समस्येमुळे ग्रामस्थांसह जनावरांनाही पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. जनावरांना पुरेसे पाणी उपलब्ध होत नसल्याने दुग्धव्यवसायावरही परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या प्रश्नाकडे प्रशासनाने विशेष लक्ष देण्याची गरज असल्याचे ग्रामस्थांनी नमूद केले.

गावातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तसेच जनावरांच्या पाण्याची गरज लक्षात घेता, प्रशासनाने विलंब न करता वटणवाडी गावासाठी पाणी टँकर मंजूर करावा. तसेच कायमस्वरूपी पाणीपुरवठ्याची व्यवस्था करून ग्रामस्थांना दिलासा द्यावा, अशी विनंती किरण शिनगिरे, दीपक शिरोळे, बाळासाहेब पोकळे यांच्यासह ग्रामस्थांनी प्रशासनाकडे केली आहे.

# दुष्काळात महिलांच्या मायक्रो फायनान्स कर्जवसुलीचा छळ थांबवा!

## हजारो महिलांचा मायक्रो फायनान्स संस्थांवर धडक मोर्चा; सात दिवसांत निर्णय न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

## काही बँकांचे प्रतिनिधी सहकार्याच्या भूमिकेत; तर काहींनी बँकांना कुलूप लावून काढला पळ — जगदीश भाऊ नरवाडे

**महागाव | प्रतिनिधी**

यवतमाळ जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतकरी व शेतमजूर आर्थिक संकटात सापडले असताना, रोजगाराअभावी महिला बचत गटांच्या कर्जफेडीचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर जन आंदोलन आधार संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष जगदीश भाऊ नरवाडे यांच्या नेतृत्वाखाली महागाव शहरातील विविध मायक्रो फायनान्स बँकांवर हजारो महिलांनी धडक मोर्चा काढत निवेदने सादर केली. महिलांच्या कर्जवसुलीला काही महिन्यांसाठी स्थगिती देण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

या आंदोलनादरम्यान काही बँकांचे प्रतिनिधी बँकांना कुलूप लावून निघून गेल्याचे निदर्शनास आले, तर काही बँकांच्या प्रतिनिधींनी सहकार्याची भूमिका घेत दुष्काळग्रस्त महिलांना मदत करण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला. दुष्काळाच्या कठीण काळात महिलांना सहकार्य करावे, असे आवाहन आंदोलनातून करण्यात आले.

■ **रात्री दहाला महिलेच्या घरी वसुलीसाठी धडक; अश्रूंनी मांडली व्यथा**

आंदोलनादरम्यान एका महिलेने आपल्यावर झालेल्या कथित वसुलीच्या दबावाची व्यथा मांडली. एका मायक्रो फायनान्स संस्थेच्या कर्मचाऱ्याने रात्री दहा वाजता महिलेच्या घरी जाऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांशी व्हिडिओ कॉलवर बोलण्यास भाग पाडल्याचा आरोप करण्यात आला. यामुळे संबंधित महिला सर्वांसमोर अक्षरशः रडू लागली आणि तिने आपली व्यथा व्यक्त केली. या घटनेमुळे उपस्थित महिलांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले.



■ **महिलांचा अपमान व दमदाटी खपवून घेणार नाही**

यावेळी बोलताना जगदीश भाऊ नरवाडे म्हणाले की, "दुष्काळामुळे हाताला काम नाही, घरात उत्पन्न नाही; अशा परिस्थितीत महिलांना कर्जाच्या हप्त्यांसाठी मानसिक त्रास देणे, दमदाटी करणे आणि रात्री-अपरात्री घरात जाऊन व्हिडिओ चित्रीकरण किंवा महिलांचे फोटो काढणे, असे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत. जन आंदोलन आधार संघर्ष समिती महिलांच्या सन्मानासाठी आणि न्यायासाठी ठामपणे उभी राहील. महिलांना त्रास देणाऱ्या व कायद्याचा भंग करणाऱ्या वसुली प्रतिनिधींविरुद्ध पुराव्यांसह संबंधित यंत्रणांकडे तक्रारी करून कायदेशीर कारवाईची मागणी करण्यात येईल."



■ **जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने निर्णय घ्यावा**

दुष्काळग्रस्त शेतकरी आणि शेतमजूर महिलांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन महिला बचत गटांच्या कर्जवसुलीला काही महिन्यांसाठी स्थगिती देण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने शासन व संबंधित नियामकांच्या माध्यमातून कार्यवाही करावी. सर्व संबंधित मायक्रो फायनान्स संस्था व बँकांना नियमानुसार निर्देश द्यावेत आणि महिलांना मानसिक त्रासापासून दिलासा द्यावा, असे आवाहन जगदीश भाऊ नरवाडे यांनी केले.

जन आंदोलन आधार संघर्ष समितीच्या वतीने सर्व मायक्रो फायनान्स कंपन्यांना कर्जवसुली स्थगित करण्याबाबत निवेदन देण्यात आले. सात दिवसांत शासन व संबंधित बँकांनी निर्णय घ्यावा; अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा जगदीश भाऊ नरवाडे यांनी दिला.

हजारो महिलांच्या उपस्थितीत झालेल्या या आंदोलनामुळे महागाव तालुक्यात महिला कर्जदारांच्या प्रश्नाला वाचा फुटली असून, आता प्रशासन या मागणीवर काय निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. निवेदन देतेवेळी जगदीश भाऊ नरवाडे यांच्यासह अंजुम शेख फिरोज शेख अजित मुसाफ शेख शारदा पवन तर्फे आरती गजानन मस्के वर्षा गजानन सुरवसे अर्चना भिकाजी होळीचा संजय मिरासे पूजा चव्हाण त्यांच्यासह हजारो संख्येने भगिनी निवेदन देते वेळेस उपस्थित होत्या.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
● बीड, शनिवार, 17 ऑक्टोबर 2026

# पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांची जालना जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीवर अधिकाऱ्यांशी चर्चा

## पिण्याचे पाणी, जनावरांना चारा, शेतकऱ्यांना मदतीबरोबरच दुष्काळ निवारणासाठी प्रभावी नियोजन करण्याचे निर्देश

## गांव दत्तक अभियानांतर्गत सर्वांगीण विकासासाठी अंतरवाली सराटी गाव घेतले दत्तक ; पुढील महिन्यात गावास भेट देणार

## दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत, सामुहिक विवाह सोहळ्याला प्रोत्साहन द्या

**जालना | प्रतिनिधी**

जिल्ह्यातील दुष्काळाची तीव्रता लक्षात घेऊन पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी प्रभावी नियोजन करावे. पीक पंचनामे तातडीने पूर्ण करून शेतकऱ्यांना मदत मिळवून द्यावी, असे निर्देश राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी आज दिले. गांव दत्तक अभियानांतर्गत सर्वांगीण विकासासाठी अंतरवाली सराटी दत्तक घेत असल्याचे सांगून पुढील महिन्यात आपण या गावास भेट देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पालकमंत्री ना.पंकजाताई मुंडे आज जालना दौऱ्यावर होत्या, जिल्हाधिकारी कार्यालयात विभाग प्रमुखांच्या बैठकीत त्यांनी जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेतला, त्यावेळी त्या बोलत होत्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्ण कांत कनवारीया, मनपा आयुक्त अंजली शर्मा, पोलीस अधिक्षक तेगबीर सिंह संधु, अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, जि प चे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी गहिनीनाथ कापसे आदी यावेळी उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री मुंडे पुढे म्हणाल्या की, जिल्ह्यातील ९५४ गावांमध्ये दुष्काळ परिस्थिती असून, या गावातील पीक पंचनामे पूर्ण झाले आहेत. पीकविमा प्रक्रियेतही पारदर्शकता व अचूकता राखण्याच्या सूचना देत, शेतकऱ्यांना पीक विम्याचा जास्तीत-जास्त लाभ



मिळेल यासाठी प्रयत्न करावा असे निर्देश दिले.

### ■ पिण्याचे पाणी, चाऱ्याचे नियोजन

पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देत टँकरद्वारे होणाऱ्या पाणीपुरवठ्यावर जीपीएस प्रणालीने नियंत्रण ठेवावे, जलस्त्रोतांचे पुनर्भरण करावे तसेच नदी-नाल्यांचे खोलीकरण करावे, असे त्यांनी सांगितले. पाणी वापरात दहा टक्के कपातीच्या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी करावी आणि बांधकामांसाठी पिण्यायोग्य पाण्याचा वापर टाळावा, असेही निर्देश त्यांनी दिले.

जनावरांसाठी चारा उपलब्ध व्हावा यासाठी चारा साक्षरता अभियान राबवून मुरघास, हायड्रोपोनिक्स व अझोला चारा उत्पादनाचे प्रशिक्षण द्यावे. रोजगार हमी योजनेची कामे जलसंधारणाशी जोडून विहिरींची दुरुस्ती, गाळ काढणे आणि जलस्त्रोतांचे पुनर्जीवन यांना प्राधान्य द्यावे, असे मुंडे यांनी स्पष्ट केले.

### ■ शेतकऱ्यांना मदत, सामुहिक विवाह सोहळ्याला प्रोत्साहन द्या

दुष्काळ परिस्थितीत शेतकऱ्यांवर मानसिक ताण येऊ नये यासाठी गावपातळीवर मोठ्या प्रमाणावर समुपदेशन व संवाद उपक्रम राबवून त्यांचे मनोबल वाढवावे असे सांगत टंचाईच्या काळात सामुहिक विवाह सोहळ्यांना प्रोत्साहन द्या, पाणी पुरवठा योजनांची वसुली करताना मवाळ धोरण ठेवा असे त्या म्हणाल्या.

### ■ सर्वांगीण विकासासाठी अंतरवाली सराटी गांव दत्तक

'गाव दत्तक अभियान' अंतर्गत दुष्काळग्रस्त गावांना मदत देण्याच्या उपक्रमाचे त्यांनी स्वागत केले. या अंतर्गत सर्वांगीण विकास करण्याच्या उद्देशाने आपण अंतरवाली सराटी गाव दत्तक घेत असल्याचे त्यांनी सांगितले. आचारसंहितेनंतर याठिकाणी आपण भेट देणार असल्याचे त्या म्हणाल्या. दुष्काळग्रस्तांना मदत करताना सीएसआर च्या बरोबरीने गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठान देखील पुढे राहील असे त्या म्हणाल्या.

### ■ जलसंवर्धनाची कामे हाती घ्या

शेतकरी व ग्रामीण मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी व्हीबी-जी रामजी योजनेंतर्गत रोजगारनिर्मितीची कामे प्रभावीपणे राबवावीत. जलसंधारण, नदी-नाल्यांचे खोलीकरण, गाळ काढणे, जलस्त्रोतांचे पुनर्भरण आणि विहिरींची दुरुस्ती यांसारख्या कामांना प्राधान्य देऊन शेतकऱ्यांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून द्यावा. यामुळे दुष्काळग्रस्त कुटुंबांना आर्थिक आधार मिळण्यासोबतच भविष्यातील पाणीटंचाईवर मात करण्यास मदत होईल. पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये रिचार्ज शाफ्ट, बंधारे व नाला खोलीकरणासाठी निधी उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात येणार असून, भविष्यातील दुष्काळाचा सामना करण्यासाठी आतापासूनच उपाययोजना करण्यावर बैठकीत भर देण्यात आला.

### ■ टँकरद्वारे पाणीपुरवठ्याचा आढावा

यावेळी पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी पीक पंचनामे, जिल्ह्यातील प्रकल्पातील पाणीसाठा, टँकरद्वारे पाणीपुरवठा, चारा उपलब्धता, रोजगार हमी योजना आणि शहरी व ग्रामीण भागातील पाणीपुरवठ्याचा आढावा घेतला.



**आष्टी प्रतिनिधी तालुक्यातील वटणवाडी येथे कृषी विभागामार्फत जागतिक महिला शेतकरी दिनानिमित्त आत्मा अंतर्गत महिला किसान गोष्टी कार्यक्रम वटनवाडी येथे दि.15 ऑक्टोंबर रोजी संपन्न. यावेळी महिलांना शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले त्याचबरोबर शेतकरी प्रमाणपत्र व औषध वाटप करण्यात आले. यावेळी उपस्थित तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, शिवम सिंग यादव, किरण शिनगिरे, स्वप्रिल जोगदंड, जगधने ,राजेंद्र धोंडे, श्रीमती आशा भुकन, श्रीमती वायकर, तसेच वटणवाडी येथील सर्व महिला बचतगटाच्या सदस्या उपस्थित होत्या.. छायाचित्र देऊळगाव (आदिनाथ ठोंबरे)**

# तेली समाज दांडिया महोत्सवात नगरसेविका डॉ. पूजा तोतला यांच्या हस्ते देवीची आरती संपन्न

## दांडिया महोत्सवात रंगली महिलांची 'होम मिनिस्टर' स्पर्धा; महिलांचा उत्स्फूर्त सहभाग





**परळी वैजनाथ |** तेली समाज सार्वजनिक दांडिया महोत्सवाच्या पाचव्या पुष्पानिमित्त गुरुवारी पाचव्या माळेची आरती परळी नगरपालिकेच्या नगरसेविका तथा स्थायी समिती सदस्या डॉ. पूजा प्रितेश तोतला यांच्या हस्ते, तर शनिदेवाची आरती भाजपचे युवानेते प्रितेश तोतला यांच्या हस्ते भक्तिमय वातावरणात संपन्न झाली.

याप्रसंगी तेली समाज दांडिया उत्सव समितीच्या वतीने डॉ. पूजा तोतला व प्रितेश तोतला यांचा पुष्पहार व शाल देऊन सत्कार करण्यात आला. तेली समाज सार्वजनिक दांडिया महोत्सवात महिलांची लक्षणीय उपस्थिती पाहायला मिळाली. पारंपरिक दांडियाच्या उत्साहासोबतच आयोजित करण्यात आलेल्या 'होम मिनिस्टर' स्पर्धेला महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विविध उपक्रमांमुळे महोत्सवात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. या कार्यक्रमास मल्लिकार्जुन साखरे, नागनाथ आप्पा भाग्यवंत, छगन आप्पा क्षीरसागर, अशोक बेंडे, चंद्रशेखर फुटके, ओंकार सोनटक्के, अजय सोनटक्के, शिवशंकर जठार, विनोद आळणे, शिवराज सोनटक्के, सोमनाथ क्षीरसागर, महारुद्र विटेकर यांच्यासह तेली समाज दांडिया उत्सव समितीचे अध्यक्ष तथा युवानेते पवन फुटके, सोमनाथ वाघमारे, अशोक रोकडे, राजकुमार भाग्यवंत, सचिन लासे, सतीश फुटके, राहुल क्षीरसागर, सुनील क्षीरसागर, दीपक साखरे, ईश्वर राऊत, रवी अन्नपूर्णे, शंकर कौले, ईश्वर जठार, गजानन बेंडे, प्रदीप पिंपळे, महेंद्र अन्नपूर्णे, अमोल क्षीरसागर, योगेश व्यवहारे आणि प्रसाद जठार यांच्यासह तेली समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जंक फूडपासून दूर राहून सकस आहार घ्या, आरोग्याची काळजी घ्या!.. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. लक्ष्मण मोरे यांचे विद्यार्थिनींना आवाहन

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सेवा संकल्प अभियानाचा आरोग्य तपासणी शिबिराने समारोप

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**





विद्यार्थिनींनी जंक फूडपासून दूर राहून सकस व संतुलित आहाराचे सेवन करावे आणि आपल्या आरोग्याची नियमित काळजी घ्यावी, असे आवाहन तालुका आरोग्य अधिकारी डॉ. लक्ष्मण मोरे यांनी केले.

कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग, तालुका आरोग्य विभाग आणि रेड रिबन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सेवा संकल्प अभियानाचा समारोप विद्यार्थिनींच्या आरोग्य तपासणी शिबिराने करण्यात आला. यावेळी डॉ. मोरे बोलत होते. या कार्यक्रमास संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा. प्रसाद देशमुख, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. लक्ष्मण मोरे, डॉ. वैभव डुबे, प्राचार्या डॉ. विद्याताई देशपांडे, डॉ. हांगे, डॉ. प्रज्ञा ढाकणे, डॉ. ऋतुजा कांदे आणि राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. विवेकानंद कवडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर डॉ. लक्ष्मण मोरे यांच्या हस्ते आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. मोरे यांनी विद्यार्थिनींना आहार आणि आरोग्याचे महत्त्व पटवून दिले. आरोग्य चांगले असेल तर अभ्यासातही चांगली प्रगती करता येते. त्यामुळे विद्यार्थिनींनी फास्ट फूड व जंक फूडचे सेवन टाळून पौष्टिक आहाराला प्राधान्य द्यावे, असे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोप करताना संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा. प्रसाद देशमुख म्हणाले की, आहारातील पोषक घटकांच्या कमतरतेमुळे अनेक मुलींमध्ये हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी आढळते. त्यामुळे विद्यार्थिनींनी लोहयुक्त व सर्व पोषक घटकांचा समावेश असलेला संतुलित आहार घ्यावा आणि आरोग्याबाबत जागरूक राहावे. मुलींचे आरोग्य उत्तम असेल, तर संपूर्ण कुटुंबाचे आरोग्य चांगले राहण्यास मदत होते, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. विवेकानंद कवडे यांनी केले. सूत्रसंचालन कनिष्ठ विभागाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. प्रविण फुटके यांनी केले, तर आभार प्रा. डॉ. पंढरी गुट्टे यांनी मानले. या आरोग्य तपासणी शिबिरात तालुका आरोग्य विभागाचे शिवाजी वैद्य, विष्णू मुंडे, सागर जाधव, आशिष वाघमारे, राठोड मॅडम, बरेवाड मॅडम, नेमाडे मॅडम, चव्हाण मॅडम, भंडारे मॅडम, येमले मॅडम, कराड मॅडम, गित्ते मॅडम, डी. बी. आरसुळ मॅडम आणि जे. डी. आरसुळ मॅडम यांनी विद्यार्थिनींची आरोग्य तपासणी केली.